माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये
## प्राप्त झालेले द्वितीय अपील

**अपील क्रमांक : ३४३/२०२२**

**अपिलार्थी – श्री. प्रकाश सोमाजी नाकतोडे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रशासन अधिकारी,**
**पंचायत समिती, मोहाडी, ता. मोहाडी, जि. भंडारा**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, मोहाडी, ता. मोहाडी, जि. भंडारा**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०४.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.०९.२०२१ | १४.१०.२०२१ | १५.११.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.३०.०९.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "दि. ०९.०९.२०१९ च्या शासनाने सुधारित आदेश पारित करून ग्रामसेवक मुख्यालयी राहत आहेत असे ग्रामसभेमध्ये ठराव घेऊन व तो मंजूर करून पंचायत समिती मध्ये ग्राम पंचायतीने ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्याचे ग्रामसभेच्या सादर केलेल्या ठरावाच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेच्या ठरावाच्या सत्यप्रती देणेबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.१०.२०२१ रोजीच्या पत्रातील प्रतिलिपीमध्ये, "आपण मागितलेली माहिती ही सहा. जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, मोहाडी यांच्याशी संबंधित असल्यामुळे त्यांना मानीव जन माहिती अधिकारी म्हणून त्यांच्याकडे विचारणा केली आहे", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. १५.११.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती अप्राप्त" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दि. ०४.०२.२०२२** रोजी "माहिती अपुरी व दिशाभूल करणारी मिळाली" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. ०४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. ०३.०४.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. प्रकाश सोमाजी नाकतोडे यांनी दि. ३०.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्याचे ग्रामसभेच्या ठरावाच्या ग्रामपंचायतीच्या अशा ठरावांची माहिती मागितली आहे. त्यावर दि. १४.१०.२०२१ रोजी पंचायत समिती, मोहाडी यांच्यावतीने सहा. जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, मोहाडी यांच्याशी संबंधित असल्यामुळे त्यांना मानीव जन माहिती अधिकारी म्हणून त्यांच्याकडे विचारणा केली आहे असे अपिलार्थीस कळविले. मात्र यातील माहिती अप्राप्त असल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी, श्री. नाकतोडे यांनी दि. १५.११.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज तसेच तक्रार अर्ज तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मोहाडी यांना सादर केलेला आढळून येतो. त्यावर सुनावणी घेत प्रत्येक ग्रामपंचायत हे स्वतंत्र प्राधिकरण असल्याचे जाणीव करून देत स्वतंत्र माहिती अर्ज दाखल करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच कलम ६ (३) च्या तरतुदीनुसार जोडपत्र अ हे कुठल्याही एका प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे अपेक्षित असून अपिलकर्ता यांनी पंचायत समितीकडे दाखल जोडपत्र अ हे सर्व ग्रामपंचायतीकडे माहिती मागितली असून ती कलम २ (च) नुसार संकलित स्वरुपात उपलब्ध नाही. प्रस्तुत प्रकरणी करणे, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी स्तरावरून देण्यात आलेला प्रतिसाद व पारित केलेला आदेश हा माहिती अधिकार कायद्याशी सुसंगत असून दि. ०४.०२.२०२२ रोजी अपिलकर्ता यांनी दाखल केलेला द्वितीय अपील अर्ज हा तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.

तसेच अशा प्रकारचे माहिती अर्ज ज्यात विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागण्यात आली असून ती एकापेक्षा जास्त जन माहिती अधिकाऱ्यांकडे उपलब्ध असल्यास त्यासाठी स्वतंत्र माहिती अर्ज करण्याची तरतूद असून अशा प्रकारे एकापेक्षा जास्त प्राधिकरणानी माहिती संकलित करणे हे मूळ माहिती अधिकार कायद्याला अपेक्षित नसून कलम ४ (१) अन्वये सर्वच प्राधिकरणानी स्वतंत्रपणे व स्वतःहून माहिती उघड करणे हे आवशयक आहे. यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने यापुढील कालावधीत अशा प्रकारच्या माहिती अर्जांना मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे जास्तीत जास्त माहिती स्वयंप्रेरणेने उघड करण्याची कार्यवाही सर्व जन माहिती अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे.

**मा. सर्वोच्च न्यायालयामधील मूळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, दि. १७ ऑगस्ट, २०२३ चे आदेश तसेच सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. रामाआ २०१९/प्र.क्र.१८/सहा, दि. १६.०२.२०२३ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ च्या अंमलबजावणीबाबत सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक शासकीय व निमशासकीय कार्यालयामधील स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अनुसार १७ मुद्द्यांची माहिती वेळोवेळी (दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै) अद्ययावत करण्यात यावी. तसेच कलम ४ व्यतिरिक्त आपल्या कार्यालयातील स्वयंप्रेरणेने प्रदर्शित करणे**

आवश्यक असलेली सर्व माहिती आपल्या अधिकृत संगणक संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करण्यात यावा.

<u>आदेश</u>

प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
महाराष्ट्र राज्य * नागपूर *

ठिकाण : नागपूर
दिनांक : ०३.०४.२०२४

जावक क्रमांक ----------4470---------------दिनांक ----------19 JUL 2024----------

c:\users\rma\desktop\prajakta\appeal order\3.4.2024\343-2022.docx